**Shareholders can claim their unclaimed dividend by writing to the Company / Registrar and Transfer Agent of the Company viz. Link Intime India Private Limited by providing Investor Service Request Form ISR – 1, Form ISR - 2 and Form No. SH 13 (Nomination Form) duly filled as per the instructions stated therein along with the supporting documents including original cancelled cheque stating the name of account holder in case of physical securities.** The Investor Request Forms are available at the website of our RTA at**:** www.linkintime.co.in ➔ Resources➔ Downloads➔ KYC Formats. **Copy of the client master list is to be submitted in case of securities in electronic form. Payment will be made to the Bank Account registered against the demat account.** Please note that you are requested to send the documents for claiming the dividends by **July 22, 2024**. In case the dividends are not claimed by the said date, the Company would initiate necessary action for transfer of shares held by you to the IEPF without any further notice, in accordance with the Rules, as under:

- **For shares held in physical form** - New share certificate(s) in lieu of the original share certificate(s) will be issued and transferred in favour of the IEPF Authority on completion of necessary formalities. The original share certificate(s) which stand registered in the name of the shareholder will be deemed cancelled and non-negotiable.
- **For shares held in electronic form** - The Company shall inform the Depositories to execute the corporate action and debit the shares lying in your demat account and transfer such shares in favour of the IEPF Authority.

As per SEBI norms outstanding payments will be credited directly to the bank account if the folio is KYC Compliant. **Payment can be made to shareholders holding shares in physical form if the folio is KYC compliant**.

The concerned shareholder(s) are further informed that all future benefits arising on such shares would also be transferred to the IEPF Authority.

**Please note that no claim shall lie against the Company in respect of amount of unclaimed dividend and equity shares transferred to the IEPF Authority pursuant to the said Rules.**

Shareholder(s) may please note that in the event of transfer of their unclaimed dividend and shares to the IEPF Demat Account, they may claim from the IEPF Authority both the unclaimed dividend amount and the shares including all benefits accruing on such shares can be claimed from the IEPF Authority by making an online application in the prescribed e-Form IEPF-5 available on the website www.iepf.gov.in and sending the physical copy of the same duly signed (as per the specimen signature recorded with the Company) to the Company at its Registered Office along with the requisite documents enumerated in e-Form IEPF-5.

In case of any queries or assistance on the subject matter, the shareholders may contact the Registrar and Transfer Agent of the Company viz. Link Intime India Private Limited, C-101, 1st Floor, 247 Park, Lal Bahadur Shastri Marg, Vikhroli West, Mumbai – 400 083, Tel: +91 810 811 8484, Fax: +91 22 6656 8494, Email: csg-unit@tcplindia.co.in Website: www.linkintime.co.in.

For **Rallis India Limited**

**Sd/-**
**Srikant Nair**
**Company Secretary**
**(Nodal Officer)**

Place: Mumbai
Date: April 3, 2024

# कच्छथिवूवरून रंगला राजकारणाचा फड

**राज्य-मिती**
तमिळनाडू

तमिळनाडूच्या समुद्रकिनाऱ्यापासून दक्षिणेकडे ३३ किलोमीटरवर असलेले कच्छथिवू हे निर्मनुष्य बेट गेल्या चार दिवसांत अचानक प्रकाशझोतात आले आहे. इंदिरा गांधी यांनी १९७४ मध्ये हे बेट श्रीलंकेला दिल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकताच केला. त्यावरून राजकीय आरोप -प्रत्यारोपांना तोंड फुटून प्रचाराची दिशा अचानक अस्मितेच्या उंबरठ्यावर पोहचली आहे.

**प्रसाद इनामदार**


पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचे रणशिंग फुंकले असून आणि देशभरात त्यांचे प्रचार दौरे सुरू झाले. यादरम्यान तमिळनाडूमध्ये एका सभेत बोलताना, 'कच्छथिवू बेट हे इंदिरा गांधी यांच्यामुळे श्रीलंकेच्या ताब्यात गेले आणि त्यामुळे भारताच्या हातून हे सामरिक तळ निसटले, असा आरोप त्यांनी केला. तसेच भारतीय मच्छिमारांना अनेकदा त्रास सहन करावा लागत आहे, असा मुद्दा उपस्थित करून पंतप्रधानांनी काँग्रेसवर शरसंधान केले आणि विषयावर राष्ट्रीय पातळीवर चर्चा सुरू झाली.

पंतप्रधानांच्या आरोप खोडून काढताना काँग्रेसकडून पी. चिदंबरम यांनी पंतप्रधानांनी चुकीचा इतिहास सांगून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचे सांगत १९७४ मध्ये संपुष्टात आलेला वाद मुद्दाम उकरून काढल्याचा आरोप केला. लाखो तमीळ नागरिकांना मदत करण्यासाठीच इंदिरा गांधींनी ते पाऊल उचलले असल्याची पुष्टीही त्यांनी जोडली.

''पंतप्रधानांनी गेल्या दहा वर्षांत तमिळनाडूच्या विकासासाठी काहीही केलेले नाही. आता निवडणुकीच्या तोंडावर ते अचानक जागे झाले आहेत. निवडणुकीत कोणताच मुद्दा उपस्थित करता येत नसल्यामुळे मच्छिमारांबद्दलचा खोटा कळवळा दाखविताना कच्छथिवू बेटाचा मुद्दा उपस्थित केला आहे,'' अशी प्रतिक्रिया तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी पंतप्रधानांच्या दिली. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर म्हणाले की, ''हा मुद्दा अचानक पुढे आलेला नाही. केंद्र सरकारने हा मुद्दा वारंवार उपस्थित केलेला आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले हे बेट श्रीलंकेला देऊ केल्याचे कोणी लपवून ठेवले? हे जाणून घेण्याचा जनतेला पूर्ण हक्क आहे.''

या निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत तमिळनाडूमध्ये यश मिळविण्यासाठी भाजप प्रयत्नशील आहे. त्यासाठी गेल्या पाच वर्षांपासून त्यांच्याकडून मशागत सुरू आहे. सद्यःस्थितीत राज्यात अण्णा द्रमुक, द्रमुक आणि काँग्रेस हे त्यांच्यापुढील सर्वांत मोठे स्पर्धक आहेत. भाजपने 'एनडीए'च्या माध्यमातून निवडणूक लढविताना 'पीएमके' आणि तमीळ मनिला काँग्रेसला बरोबर घेतले आहे. गेल्या दोन महिन्यांत पंतप्रधान मोदी यांनी सातत्याने या राज्याचा दौरा करून विविध विकासकामांचे उद्‍घाटन केले आहे. विविध योजना मंजूर करून जनमत भाजपच्या बाजूने वळविण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

माजी मुख्यमंत्री जयललिता यांच्या निधनानंतर कमकुवत झालेला अण्णाद्रमुकही पक्षही राज्यात पुन्हा स्वतःचे स्थान बळकट करण्यासाठी प्रयत्नशील आहे. स्टॅलिन यांचा राज्य कारभार पाहता त्यांच्या पक्षाला लोकसभा निवडणुकीत पराभूत करणे सोपे नसल्याची जाणीव भाजपच्या नेतृत्वाखालील आघाडीला झालेली आहे. अशावेळी एखादा मुद्दा पुढे आणून त्यामाध्यमातून अस्मितेचे मुद्दा महत्त्वाचा करून जनमत वळविण्याची खेळी भाजपने खेळली आहे. एकीकडे कच्छथिवू बेटावरून राजकीय धुरळा उडत असताना हे बेट पुन्हा भारताच्या मालकीचे होण्याच्या शक्यता किती आहेत हे तपासावे लागेल. सध्या मात्र विरोधकांना या मुद्याभोवती गुंतवून ठेवण्यामध्ये भाजपचा विचारगट यशस्वी झाल्याचे दिसते.



**असे आहे बेट**
- भारत आणि श्रीलंकेदरम्यानच्या पाल्कच्या सामुद्रधुनीत स्थान
- १.६ किलोमीटर लांबी असलेल्या बेटाचा २८२ एकर क्षेत्रावर विस्तार
- भारतीय किनाऱ्यापासून ३३ तर श्रीलंका किनाऱ्यापासून ६२ किलोमीटरवर अंतर
- श्रीलंकेतील मच्छीमारांना थांबण्यासाठीचे ठिकाण
- बेटावर कोणत्याही प्रकारची वस्ती नाही, पिण्यासाठी पाणीही नाही

### मच्छीमारांवर कारवाई
श्रीलंकेच्या ताब्यातील कच्छथिवू बेट परिसरात प्रवेश केल्यामुळे मागील वीस वर्षांत सहा हजारांपेक्षा जास्त भारतीय मच्छीमारांना अटक झाली आहे. एक हजार १७५पेक्षा जास्त नावा जप्त झाल्या आहेत.

### अनेकदा विषय पटलावर
भाजपचे तमिळनाडूचे प्रदेशाध्यक्ष के. अण्णामलाई यांनी माहितीच्या अधिकारात बेटासंदर्भात झालेला करार आणि वाद यांची माहिती मिळविली आणि या विषयाला पुन्हा एकदा तोंड फुटले. या बेटावरून तमिळनाडू विधानसभेमध्ये ठरावही करण्यात आलेले आहेत आणि विधानसभा निवडणुकीवेळीही हा मुद्दा पुढे आणण्याचा प्रयत्न झालेला होता.

## फास्ट न्यूज

### 'तुमच्याकडे पाठवू वीस हजार हत्ती'
म्युनिच : शिकार करून प्राण्यांचे शीर घेऊन त्याची मिरवणूक काढण्याच्या प्रकारावर मर्यादा आणली जावी, या जर्मन सरकारच्या सल्ल्यावर बोट्सवाना सरकारने संताप व्यक्त केला आहे. 'संवर्धनाच्या टोकाच्या नियमांमुळे आमच्याकडे हत्तीच्या संख्येचा विस्फोट झाला असून तुम्हाला इतकी काळजी असल्यास तुमच्या देशात वीस हजार हत्ती पाठवतो,' असे प्रत्युत्तर या देशाचे अध्यक्ष मोकविट्सी मासिसी यांनी दिले.

### चीनमध्ये वादळाने सात जणांचा मृत्यू
बीजिंग : तुफान पाऊस आणि सोसाट्याच्या वादळामुळे चीनच्या जिआंगशी प्रांतात सात जणांचा मृत्यू झाला असून काही जण जखमी झाले आहेत. मृतांपैकी तिघा जणांचा मृत्यू वाऱ्याच्या जोरदार झोतामुळे उंच इमारतीवरून पडल्यामुळे झाला. या वादळामुळे पन्नासहून अधिक घरांची पडझड झाली असून किमान ८०० जणांना सुरक्षितस्थळी हलवावे लागले आहे.

### महिनाभरात मंदिराला लाखो भाविकांची भेट
अबुधाबी : अबुधाबी येथे दगडी बांधकाम असलेले पहिले हिंदू मंदिर असलेल्या स्वामीनारायण मंदिराला महिनाभरात सुमारे ३.५ लाख भाविकांनी भेट दिल्याची माहिती मंदिर प्रशासनाने दिली. या भव्य मंदिराचे उद्‍घाटन एक मार्च रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते. या मंदिराला किमान ५० हजार विदेशी नागरिकांनी आणि व्हीआयपी व्यक्तींनी भेट दिल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. या मंदिराच्या परिसरात दररोज संध्याकाळी साडे सात वाजता गंगा आरती केले जाते.

### जोरदार वादळाचा मिझोरामला तडाखा
ऐजॉल : मिझोरामच्या बहुतेक भागांना रविवार ते मंगळवार असे तीन दिवस वादळ आणि गारपिटीचा तडाखा बसला. मुसळधार पाऊसही पडल्याने हानीचे प्रमाण वाढले. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अडीच हजारांहून अधिक घरे, शाळांच्या व सरकारी इमारतींची पडझड झाली. मुळापासून उखडलेले गेलेले एक झाड अंगावर पडल्याने एका महिलेचा मृत्यू झाला आहे.

# 'इंडिया' आघाडीचे पुन्हा शक्तिप्रदर्शन
## संयुक्त पत्रकार परिषद किंवा मेळाव्यासारख्या पर्यायाचा विचार

**अजय बुवा :**
सकाळ न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली, ता. ३ : दिल्लीतील रामलीला मैदानावर ३१ मार्चला झालेल्या 'इंडिया' आघाडीच्या संयुक्त सभेमुळे विरोधी पक्षांचा आत्मविश्वास वाढला आहे. १९ एप्रिलला होणाऱ्या पहिल्या टप्प्यातील मतदानाच्या आधी पुन्हा एकदा अशाच प्रकारचे ऐक्यदर्शन घडवण्याचा विरोधकांचा प्रयत्न असल्याचे समजते. अर्थात, यासाठी संयुक्त पत्रकार परिषद किंवा मेळावा यासारख्या पर्यायावर चाचपणी सुरू असल्याचेही कळते.

'इंडिया' आघाडीच्या सूत्रांनी सांगितले, रामलिला मैदानावरील संयुक्त सभेमुळे विरोधी पक्षांच्या नेत्यांमधील जागा वाटपावरून असलेले मतभेद संपुष्टात आले असून ऐक्याची प्रक्रिया अधिक मजबूत झाली आहे.

संयुक्त जनता दलाचे नेते नितीशकुमार यांचे भाजपसोबत जाणे, पाठोपाठ लोकदलाचे नेते जयंत चौधरी यांची भाजपसोबतची हातमिळवणी, त्यात पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस व काँग्रेस यांच्यात जागा वाटपावरून सुरू असलेली कुरघोडी तर केरळमध्ये डावी आघाडी आणि काँग्रेसचा संघर्ष यामुळे 'इंडिया' आघाडी विखुरणार, असे चित्र तयार झाले. पण, केजरीवाल यांच्या समर्थनार्थ सर्व विरोधी एकत्र आल्याने एकजुटीचा संदेश मतदारांपर्यंत गेल्याकडे या सूत्रांनी लक्ष वेधले. त्यामुळे मतदानाच्या आधी शक्तीप्रदर्शन करावे, असा विचार सुरू आहे.



नवी दिल्ली : रामलीला मैदानावर इंडिया आघाडीच्या वतीने रविवारी (ता. ३१) झालेल्या सभेला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे आघाडीतील घटक पक्षांचे मनोधैर्य उंचावले आहे,

**भाकपची नाराजी दूर करणार**
केरळच्या वायनाडमध्ये डी. राजा यांच्या पत्नी ॲनी राजा भाकपच्या उमेदवार आहेत. उमेदवारीबाबत भाकपने विचारणा करूनही राहुल गांधींनी आधी स्पष्टता दर्शविली नसल्याने राजा नाराज होते. त्यापार्श्वभूमीवर राहुल गांधींनी व्यासपीठावर राजा यांना अजूनही नाराज आहात काय?, असे विचारून त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला.

### आप-काँग्रेसचा समन्वय वाढला
आपचे नेते तुरुंगात असल्याने रामलिला मैदानावरील सभेसाठीच्या तयारीसाठी विरोधी पक्षाच्या नेत्यांशी संपर्काची जबाबदारी आपचे तिसऱ्या फळीचे नेते आतिशी, सौरभ भारद्वाज हे सांभाळत होते. या नेत्यांचा मल्लिकार्जुन खर्गे, सोनिया गांधी, राहुल गांधींशी थेट संपर्क झाल्याने आप आणि काँग्रेसमध्ये समन्वय वाढण्यास यामुळे मदत झाली.

### सहमतीनेच पाच मागण्या
प्रियांका गांधींनी या सभेत 'इंडिया' पाच मागण्या मांडल्या. या मागण्याही सर्व पक्षांच्या सहमतीने तयार करण्यात आल्या होत्या. त्यात जाणीवपूर्वक अरविंद केजरीवाल आणि हेमंत सोरेन यांच्या सुटकेच्या मागणीचा क्रम नंतरचा ठेवला होता. भूतकाळातील केजरीवाल यांनी केलेल्या गंभीर आरोपांची पार्श्वभूमी असूनही सोनिया गांधींनी पूर्णवेळ हजेरी लावल्याचे सांगण्यात आले.

## राजीव गांधी हत्याप्रकरणातील दोषी मायदेशी

चेन्नई, ता. ३ (पीटीआय) : माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हत्येप्रकरणी दोषी ठरलेले पण शिक्षा भोगून झालेले तिघेजण आज श्रीलंका या आपल्या मायदेशी परतले.

सर्वोच्च न्यायालयाने दोन वर्षांपूर्वी त्यांची सुटका केली होती. या दोषींनी ३६ वर्षांपेक्षाही अधिककाळ तुरुंगवास भोगला होता. व्ही. मुरुगन ऊर्फ श्रीकरन, एस. जेयाकुमार आणि बी. रॉबर्ट पायस हे तिघेही आज कोलंबोला परतले. मागील महिन्यामध्येच तमिळनाडू सरकारने मद्रास उच्च न्यायालयास दिलेल्या माहितीमध्ये श्रीलंकेच्या उच्चायुक्तालयाने मुरूगन आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या दस्तावेजांना मान्यता दिली. परकी प्रादेशिक नोंदणी कार्यालयाच्या परवानगी नंतर हे तिघेही मायदेशी जाऊ शकतील असे सांगण्यात आले होते. मध्यंतरी मुरुगन यांनी त्यांना फोटो आयडी देण्याची मागणी करत उच्च न्यायालयामध्ये धाव घेतली होती.

# पंतप्रधान कार्यालयाच्या प्रतिष्ठेची उणीव जाणवते
## डॉ. सिंग यांच्याबद्दल खर्गे यांची कृतज्ञता

**सकाळ न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली, ता. ३ : माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी पंतप्रधान कार्यालयाला दिलेली प्रतिष्ठेची उणीव सध्या जाणवत असल्याचे मत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी व्यक्त केले आहे.

डॉ. मनमोहन सिंग हे ३३ वर्षांच्या सक्रिय राजकारणातून निवृत्त झाले आहेत. त्यांची राज्यसभेची मुदत दोन एप्रिलला संपली. यानिमित्त काँग्रेस अध्यक्ष खर्गे यांनी पत्र लिहून डॉ. सिंग यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

'आपण राबविलेले आर्थिक धोरणे मोठे व तरुण उद्योजक, छोटे व्यापारी, गरीब व नोकरदार वर्गांना सारखेच फायदेशीर ठरले,' असे नमूद करून या पत्रात म्हटले आहे, ''सामान्य व्यक्तीसुद्धा देशाच्या उभारणीत योगदान देऊ शकतो, हे तुमच्या धोरणामुळे दिसून आले. यामुळेच देशातील २७ कोटी जनता दारिद्र्यरेषेखाली बाहेर येऊ शकली. आपण सुरू केलेली 'मनरेगा' योजना आजही असंघटित व अकुशल कामगारांना उत्पन्नाचे ठोस माध्यम ठरली आहे. अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष बराक ओबामा यांनी तुमच्या गौरवार्थ म्हणाले होते की, डॉ. मनमोहन सिंग जेव्हा बोलतात, तेव्हा सर्व जग त्यांना ऐकते. परंतु तुमच्यावर नंतरच्या काळात व्यक्तिगत पातळीवर हल्ले झाले. तुम्ही मोठ्या मनाने त्यांच्याबद्दल मनात कोणतीही अढी ठेवली नाही. ज्या काही सुधारणा विद्यमान सरकारने केल्या आहेत, त्याचे मूळ आपल्या धोरणांमध्ये आहे. तुम्ही पंतप्रधान कार्यालयाला एक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली होती. या प्रतिष्ठेची उणीव सध्या देशाला जाणवत आहे.




# तैवानला भूकंपाचा धक्का
## सात जणांचा मृत्यू; अनेक इमारतींचे नुकसान

तैपेई, ता. ३ (पीटीआय) : तैवानला आज सकाळी जोरदार भूकंपाचा धक्का बसल्याने पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले. रिश्टर स्केलवर ७.२ इतकी तीव्रता असलेल्या या भूकंपात सात जणांचा मृत्यू झाला असून सातशेहून अधिक जण जखमी झाले. तैवानला मागील २५ वर्षांत बसलेला हा सर्वांत मोठा भूकंपाचा धक्का होता.

भूकंपाचा केंद्रबिंदू ह्युॲलिन शहरापासून १८ किलोमीटर दूर आणि ३५ किलोमीटर खोलीवर होता. अमेरिकेच्या भूगर्भशास्त्र विभागाने भूकंपाची तीव्रता ७.८ रिश्टर इतकी सांगितली. मोठ्या भूकंपानंतर बराच काळ हादरेही जाणवत होते. त्यातील एक धक्काही ६.५ रिश्टर तीव्रतेचा होता, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. भूकंपामुळे सुरुवातीला सुनामीचाही इशारा देण्यात आला होता, तो नंतर मागे घेण्यात आला.

सकाळी आठ वाजता गर्दीची वेळ असताना आणि कामाला निघालेले नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर असताना भूकंपाचा धक्का बसला. त्यामुळे अनेक इमारतींच्या काचा फुटल्या, काही भागांची पडझड झाली. भूकंपाचा हादरा वीस ते तीस सेकंद जाणवल्याचे स्थानिकांनी सांगितले. भूकंपामुळे किमान २४ ठिकाणी दरडी कोसळल्या तर ३५ रस्ते, पूल आणि बोगद्यांना तडे गेले. मोठी पडझड झाल्याने, तसेच अपघात झाल्याने सात जणांचा मृत्यू झाला, तर ७३६ जण जखमी झाले.

भूकंपामुळे पूल हेलकावे घेऊ लागल्याने पुलावर असलेले नागरिक प्रचंड धास्तावले होते. 'आम्हाला भूकंपाच्या धक्क्यांची सवय आहे.



ह्युॲलिन : भूकंपाच्या धक्क्यामुळे बुधवारी येथील एक इमारत ४५ अंशांच्या कोनात कलंडली.

## केजरीवालांना तूर्तास दिलासा नाहीच

नवी दिल्ली, ता. ३ : दिल्लीच्या मद्यधोरण गैरव्यवहार प्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दाखल केलेला गुन्हा रद्द करावा, यासाठी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दाखल केलेल्या याचिकेवरील निर्णय आज दिल्ली उच्च न्यायालयाने राखून ठेवला.

केजरीवाल यांच्यावर आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पीएमएलए) 'ईडी'ने गेल्या २१ मार्चला गुन्हा दाखल करून अटक केली आहे. हा गुन्हा रद्द करावा, यासाठी दाखल केलेल्या याचिकेवर आज न्या. स्वर्णकांता शर्मा यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

मद्यधोरण ठरविण्यात मुख्यमंत्री केजरीवाल यांची मोठी भूमिका असून यात झालेल्या गैरव्यवहाराचे मुख्य सूत्रधार तेच असल्याचा दावा 'ईडी'चे वकील अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही राजू यांनी केला.

## संजयसिंह सशर्त जामिनावर बाहेर

नवी दिल्ली, ता. ३ : दिल्ली मद्यधोरण गैरव्यवहार प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाकडून काल जामीन मिळालेले आम आदमी पक्षाचे नेते आणि राज्यसभा खासदार संजय सिंह यांची विशेष न्यायालयाने आज सशर्त जामिनावर मुक्तता केली. संजय सिंह यांना परदेश प्रवासाला मनाई करण्यात आली आहे. ईडीच्या तपासावर भाष्य करू नये, अशी तंबीही न्यायालयाने दिली.

sanofi

**सनोफी इंडिया लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय: सनोफीहाऊस, सीटीएस. क्रमांक ११७-बी, एल अँड टी बिझनेसपार्क, साकी विहार रोड, पवई, मुंबई ४०००७२.
दूरध्वनीक्रमांक: (९१-२२) २८०३२००० फॅक्सक्रमांक: (९१-२२) २८०३२९३९
कॉर्पोरेट ओळख क्रमांक: एल२४२३९एमएच१९५६पीएलसी००९७९४
वेबसाईट: www.sanofiindialtd.com • ई-मेल: IGRC.SIL@sanofi.com

**६८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी अधिनियम, २०१३ मधील लागू तरतुदींनुसार आणि त्याअंतर्गत करण्यात आलेल्या नियमांनुसार, ५ मे २०२०, १३ एप्रिल २०२०, ८ एप्रिल २०२०, १३ जानेवारी २०२१, ८ डिसेंबर २०२१, २८ डिसेंबर २०२२ आणि २५ सप्टेंबर २०२३ रोजीची परिपत्रके आणि भारतीय प्रतिभूति व विनिमय मंडळाने (''सेबी'') जारी केलेले ७ ऑक्टोबर, २०२३ रोजीचे परिपत्रक(एकत्रितपणे ''परिपत्रक'' म्हणून संबोधलेले), यांच्या अनुषंगाने सनोफी इंडिया लिमिटेडच्या सदस्यांची ६८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) मंगळवार, १४ मे २०२४ रोजी दुपारी ३:३० वाजता एखाद्या सामायिक ठिकाणी सदस्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय व्हिडिओ कॉन्फरन्सिंग माध्यमाद्वारे आयोजित केली आहे. कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय हे ६८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे ठिकाण मानले जाईल आणि वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सहभागी होण्याच्या प्रक्रियेसंदर्भातील तपशील सर्वसाधारण सभेच्या सूचनेत प्रदान केला जाईल.

ही परिपत्रके, कायद्यातील तरतुदी आणि सूची नियमांनुसार, ज्या सदस्यांनी ईमेलद्वारे संप्रेषण प्राप्त करण्यासाठी कंपनी / डिपॉझिटरीजकडे आपला ईमेल आयडी नोंदविला आहे त्यांना ईमेल पाठवून, वार्षिक अहवाल हा २२ एप्रिल २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी प्रकाशित केला जाईल. वार्षिक अहवाल कंपनीच्या www.sanofiindialtd.com या संकेतस्थळावर आणि www.bseindia.com आणि www.nseindia.com या शेअर बाजारच्या संकेतस्थळावरही उपलब्ध असेल.

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमधील प्रस्तावांवर वार्षिक सर्वसाधारण सभेत ई-व्होटिंग कंपनीने उपलब्ध करून दिलेल्या ई-व्होटिंग प्रणालीद्वारे रिमोट ई-व्होटिंग (दूरस्थ ई-मतदान) तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठिकाणी ई-व्होटिंग (ई-मतदान) घेण्यात येईल. ई-व्होटिंग प्रणाली आणि ई-व्होटिंगच्या प्रक्रियेचा तपशील वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केला जाईल. भौतिक स्वरूपात समभाग धारण करणारे किंवा ज्यांनी आपला ईमेल आयडी नोंदणी केलेला नाही अशा सदस्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केल्याप्रमाणे ई-व्होटिंग प्रणाली आणि संबंधित प्रक्रियेचा तपशील मिळू शकतो आणि ते enotices@linkintime.co.in वर ईमेल करून ई-व्होटिंग साठी उद्देशाने अधिकारपत्रे (आयडी, पासवर्ड इ.) प्राप्त करून ई-व्होटिंग प्रणालीवर मतदान करू शकतात. सर्व तपशीलांची पडताळणी केल्यानंतर सदस्यांना अधिकारपत्रे (आयडी,पासवर्ड इ.) प्रदान केले जातील.

२३ फेब्रुवारी २०२४ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत केलेल्या शिफारशीनुसार ज्या भागधारकांची नावे ३ मे २०२४ रोजी कंपनीच्या सदस्य नोंदपुस्तकात (रजिस्टर ऑफ मेंबर्स) असतील आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) तसेच सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस लिमिटेड (सीडीएसएल) या डिपॉझिटरीजने सादर करावयाच्या तपशीलानुसार ज्यांची नावे ३ मे २०२४ रोजीच्या कामकाजाच्या वेळेच्या अंती लाभार्थी मालक म्हणून असतील, त्यांना कंपनी अंतिम लाभांश देईल.

इलेक्ट्रॉनिक स्वरूपात समभाग(शेअर्स) धारण करणाऱ्या सदस्यांना त्यांचे बँक तपशील संबंधित डिपॉझिटरीज अर्थात एनएसडीएल आणि सीडीएसएलकडे अद्ययावत(अपडेट) ठेवण्याचा सल्ला देण्यात येतो. प्रमाणपत्र स्वरुपात समभाग धारण करणाऱ्या सदस्यांनी आपले बँक तपशील कंपनीचे प्रबंधक आणि हस्तांतरण अभिकर्ता, लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडे अद्ययावत करावेत, असे आवाहन करण्यात येते.

सनोफी इंडिया लिमिटेडच्या वतीने

स्थळ : मुंबई
दिनांक : ४ एप्रिल २०२४

राधिका शाह
कायदेविषयक प्रमुख आणि कंपनी सचिव
सदस्यता क्र.:अ१९३०८

**दि ग्रेट ईस्टर्न शिपिंग कं. लि.**
CIN : L35110MH1948PLC006472
नोंदणीकृत कार्यालय : ओशन हाउस, १३४/ए, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०००१८.
दूरध्वनी क्र.: +९१(२२)६६६१३०००/२४९२२१००; फॅक्स : +९१(२२)२४९२५९००
ई-मेल : shares@greatship.com; संकेतस्थळ : www.greatship.com

**पोस्टल मतपत्रिकेची सूचना**

याद्वारे सभासदांना सूचना देण्यात येते की, कंपनी कायदा २०१३ (दि ॲक्ट) च्या लागू तरतुदी आणि कलम १०८, ११० च्या अनुपालनामध्ये, कंपनीज (मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन रुल्स) २०१४ आणि मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स (एमसीए)आणि एमसीएद्वारे जारी दिनांक ०८ एप्रिल २०२० आणि १३ एप्रिल २०२० आणि एमसीएद्वारे जारी इतर लागू परिपत्रके सह वाचावा आणि सिक्युरिटिज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाद्वारे (सेबी) जारी केलेल्या परिपत्रकानुसार, ३ वर्षांच्या म्हणजेच ०१ जून २०२४ पासून दुसऱ्या टर्मसाठी कंपनीचे स्वतंत्र संचालक म्हणून श्री. राजू शुक्ला आणि श्री. रणजित पंडित यांच्या पुनर्नियुक्तीसाठी पोस्टल मतपत्रिकेच्या मार्गाने सभासदांची मंजुरी घेण्यात येणार आहे.
कंपनी /डिपॉजिटरी सहभागीसह ज्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत आहेत त्या कंपनीच्या सभासदांना पोस्टल मतपत्रिकेची सूचना दिनांक ०३ एप्रिल २०२४ रोजी पाठविण्यात आलेली आहे. त्याचबरोबर कंपनीचे संकेतस्थळः www.greatship.com आणि बीएसई लिमिटेडचे संकेतस्थळ : www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड : www.nseindia.com आणि कफिन टेक्नॉलॉजिस लिमिटेडचे संकेतस्थळः https://evoting.kfintech.com येथे सुद्धा उपलब्ध आहे.
एमसीएद्वारे जारी परिपत्रकासह संबंधितमध्ये सूचनेच्या प्रत्यक्ष प्रती, पोस्टल मतपत्रिका अर्ज आणि प्री-पेड बिझनेस रिप्लाय पाकिटे ही पोस्टल मतपत्रिकेसाठी सभासदांना पाठविण्यात येणार नाहीत.
कंपनीच्या संचालक मंडळाने निष्पक्ष आणि पारदर्शक वातावरणामध्ये रिमोट ई-मतदानाची प्रक्रिया आणि पोस्टल मतपत्रिकेच्या आयोजनासाठी छाननीकार म्हणून श्रीमती आश्विनी इनामदार त्यांच्या अनुपस्थितीत श्रीमती अल्फिया सपतवाला, भागीदार, मेहता अँड मेहता कंपनी सेक्रेटरीज यांची नियुक्ती केली आहे.
सभासदांना रिमोट ई-मतदान सुविधा पुरविण्यासाठी कंपनीने कफिन टेक्नॉलॉजिज लिमिटेड, (कफिन) निबंधक आणि भागहस्तांतरण प्रतिनिधी यांची नियुक्तीसुद्धा केली आहे.
सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांचा होकार किंवा नकार फक्त रिमोट ई-मतदानाद्वारे पुरवावा.
सभासद ज्यांच्याकडे डिमॅट स्वरुपात वैयक्तिक भाग आहेत ते NSDL/CDSL/डिपॉजिटरी पार्टिसिपंटच्या संकेतस्थळाद्वारे रिमोट ई-मतदानाद्वारे त्यांचे मतदान करतील. इतर सभासद https://evoting.kfintech.com येथे रिमोट ई-मतदानाद्वारे त्यांचे मतदान करतील.

**रिमोट ई-मतदानाच्याबाबतीत सूचना :**
रिमोट ई-मतदान कालावधी गुरुवार, ०४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ०९.०० वाजल्यापासून सुरु होईल आणि शुक्रवार, ०३ मे २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वा. बंद होईल. वरील नमूद दिनांक आणि वेळेच्यानंतर ई-मतदानास परवानगी देण्यात येणार नाही आणि वरील कालावधी संपल्यानंतर रिमोट ई-मतदान सुविधा कफिनद्वारे खंडित करण्यात येईल.
गुरुवार २८ मार्च २०२४ रोजी ('कट-ऑफ डेट') कंपनीच्या समभाग पेड-अप भाग भांडवलाच्या त्याच्या/तिच्या भागांच्या प्रमाणात सभासदांना मतदानाचे अधिकार असतील. व्यक्ती जिचे नाव कंपनीच्या सभासद रजिस्टरमध्ये किंवा डिपॉजिटर्सद्वारे ठेवण्यात आलेल्या लाभार्थी ओनर्सच्या रजिस्टरमध्ये कट-ऑफ-दिनांका रोजी नोंदणीकृत आहे त्यालाच रिमोट ई-मतदानाची सुविधा प्राप्त होईल.सभासद जो कट ऑफ दिनांकारोजी सभासद नाही त्याने ही सूचना फक्त माहितीच्या हेतूसाठी पाहावी.

**पोस्टल मतपत्रिकेची सूचना प्राप्त करण्यासाठी ई-मेल पत्ता नोंदणीकरण/अद्ययावतीकरण करण्याबाबतच्या पद्धती :**
जर, सभासदाचा ई-मेल पत्ता कंपनीकडे/डिपॉजिटरी सहभागी यांच्याकडे नोंदणीकृत नसेल आणि त्यामुळे पोस्टल मतपत्रिकेची सूचना आणि रिमोट ई-मतदान सूचना प्राप्त झाल्या नाही तर त्यांनी विनंती ई-मेल सोबत विनंतीपत्राची स्कॅनड् प्रत, सह्या केलेली, त्यांचा ई-मेल पत्ता , मोबाईल क्रमांक, स्वसाक्षांकित पॅनची प्रत जोडून आणि क्लाएंट मास्टर प्रत, इलेक्ट्रॉनिक फोलिओच्याबाबतीत आणि भागप्रमाणपत्राची प्रत जोडून einward.ris@kfintech.com येथे पोस्टल मतपत्रिकेची सूचना पाठविण्यासाठी आणि रिमोट ई-मतदान सूचना पाठविण्यासाठी ई-मेल पाठवावा.

**केवायसी तपशील नोंदणीकरण/अद्ययावतीकरण करण्याच्या पद्धती :**
सेबी, त्यांचे परिपत्रक दिनांक ०३ नोव्हेंबर २०२१ (वेळोवेळी सुधारीत) यांनी पॅनची नोंदणी, पोस्टल पत्ता, ई-मेल पत्ता, मोबाईल क्रमांक, बँक खाते तपशील, सहीचा नमुना, आणि समक्ष सिक्युरिटिजच्या धारकांद्वारे नामांकन आवश्यक केले आहे. ज्या सभासदांकडे प्रत्यक्ष स्वरुपात भाग असतील त्यांना विनंती करण्यात येते की, संपूर्ण भरलेले आणि सही केलेले फॉर्म ISR-1, ISR-2, ISR-3/SH-13 कंपनीला किंवा कफिनला पाठवावा.
सभासद, ज्यांच्याकडे इलेक्ट्रॉनिक स्वरुपात भाग आहेत, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांचे संबंधित डिपॉजिटरी पार्टिसिपंटसह त्यांचे केवायसी तपशील नोंदणीकृत/अद्ययावत करावेत.
जर काही शंका/तक्रारी असल्यास, सभासद, सभासदांसाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) पाहू शकतात आणि ई-मतदान यूजर मॅन्युअल्स https://evoting.kfintech.com वर डाउनलोड विभागामध्ये उपलब्ध आहे किंवा evoting@kfintech.com यांना ई-मेल पाठवावा किंवा कफिन यांना १८०० ३०९ ४००१ (टोल फ्री) येथे कॉल करावा.
रिमोट ई-मतदानासंबंधित तक्रारींसाठी खालील संपर्क तपशिलाची नोंद घेण्याची विनंती सभासदांना करण्यात येत आहे :
**श्री. अनिल दळवी**
मॅनेजर
कफिन टेक्नॉलॉजिज लिमिटेड
सेलेनियम टॉवर बी, प्लॉट नं. ३१-३२, फायनॅनशिएल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, सेरिलिंगमपल्ली, गाचिबोवली, हैदराबाद-५०० ०३२ तेलंगणा.
दूरध्वनी : +९१-४० ६७१६ १६३१
ई-मेल : enward.ris@kfintech.com
रिमोट ई-मतदानाच्या निर्णयापासून दोन कामकाजाच्या दिवसांमध्ये म्हणजेच सोमवार, ०६ मे २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय येथे पोस्टल मतपत्रिकेचे निकाल घोषित करण्यात येतील. हेच निकाल कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात दर्शविण्यात येतील. हे निकाल नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड आणि बीएसई लिमिटेड जेथे कंपनीच्या भागांची यादी लावण्यात आलेली आहे ते तेथे प्रसिद्ध करण्यात येतील. अतिरिक्त निकाल कंपनीचे संकेतस्थळ www.greatship.com आणि कफिन टेक्नॉलॉजिज लिमिटेडचे संकेतस्थळ https://evoting.kfintech.com वर अपलोड करण्यात येतील.

दि ग्रेट इस्टर्न शिपिंग कंपनी लिमिटेडकरिता
आनंद पुंडे
कंपनी सचिव

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०३.०४.२०२४